# समिति दर्पण

ऑगस्ट २०२६

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये दोन अशी नऊ वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास - भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# समितीत कौशल्य विकासाचा नवा अध्याय

## अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या नावे केंद्र, डॉ, माशेलकर यांच्या हस्ते उद्घाटन

**सध्याच्या काळात जागतिक पातळीवर स्पर्धा करायची असेल, तर एआय तंत्रज्ञानाला पर्याय नाही, ग्रामीण भारताच्या उत्थानासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे, हे जाणून विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या पुढाकारातून समितीत कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र उभारण्यात आले आहे. श्री. पवार यांच्या आर्थिक सहाय्यातून समितीच्या लतिका गायतोंडे मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीत उभारलेल्या या केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते १५ ऑगस्ट रोजी झाले.**

प्रतापराव पवार यांचे नाव या केंद्राला देण्यात आले असून त्यात एआय प्रशिक्षण, रोबोटिक्स लॅब आणि परदेशी भाषा वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या केंद्राचा लाभ समितीतील विद्यार्थ्यांसह बाहेरील विद्यार्थ्यांनाही घेता येणार आहे.

या कार्यक्रमात अभिनेते योगेश देशपांडे यांनी श्री. प्रतापराव पवार यांची मुलाखत घेतली. आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत आईवडिलांचे संस्कार आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव यामुळे इथपर्यंतची यशस्वी वाटचाल करू शकलो, असे श्री. पवार यांनी सांगितले.

“ शिक्षणाने भविष्य घडते, मात्र त्यासाठी योग्य वेळी, योग्य संधी मिळायला हवी. समितीत विद्यार्थ्यांना केवळ राहण्यासाठी खोली मिळत नाही, तर आयुष्याच्या यशाची खोली मोजण्याची संधी मिळते.

- **डॉ. रघुनाथ माशेलकर,** ज्येष्ठ शास्त्रज्ञ

“ समितीत बहुतांश विद्यार्थी शेतकरी कुटुंबातील आहेत. एआयचा अभ्यास करून त्यांनी त्याचा वापर शेतीत केल्यास ग्रामीण भारताच्या विकासाला चालना मिळेल.

- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती




*कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमात समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांना चित्रकार ओंकार पवार यांनी काढलेले त्यांचे तैलचित्र भेट देण्यात आले यावेळी उपस्थित ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर*



# शाडू मातीतून साकारले बाप्पा

## १०५ विद्यार्थ्यांचा सहभाग

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रातील कला विभागाच्या शिल्पकला विषयांतर्गत ७ ते ९ ऑगस्ट दरम्यान शाडू मातीपासून गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा झाली. यात १०५ विद्यार्थी आणि काही कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

शाडू माती भिजवून त्यातून गणेश मूर्ती साकारणे, मूर्तीचे बारकावे समजून घेणे, तिची रचना करणे आणि ती रंगविण्यापर्यंतचे प्रशिक्षण यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आले. शिल्पकलेचा पूर्वानुभव नसलेल्या विद्यार्थ्यांनीही स्वतःच्या हाताने बाप्पाला साकार करण्याचा आनंद घेतला. या कार्यशाळेचे आयोजन व मार्गदर्शन चित्रकार- मूर्तिकार प्रज्ञा सातारकर, चित्रकार हेमंत राजहंस आणि प्रसिद्ध युवा शिल्पकार विराज खटावकर यांनी केले.

पान ३ वर ▶

# अमेरिकेतील ऋणानुबंधातून समितीच्या कार्याला नवी दिशा

**अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सिएटल येथे ६ ते ९ ऑगस्ट दरम्यान अधिवेशन झाले. या अधिवेशनात समितीचा स्टॉल होता. तसेच समितीचे कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी अधिवेशनाला उपस्थित राहून समितीच्या कार्याची माहिती अमेरिकेतील मराठीजनांना दिली. अधिवेशनापूर्वी त्यांनी अनेक शहरांना भेट देऊन तेथील समिती हितचिंतकांशी संवाद साधला. या दौऱ्यातील अनुभव त्यांच्याच शब्दांत...**

**तुकाराम गायकवाड,** कायम विश्वस्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बीएमएम) सिएटल येथे झालेल्या अधिवेशनाच्या निमित्ताने विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे आणि विद्यार्थी साहाय्यक समिती फाऊंडेशन, यूएसए (VSSF USA) यांच्या कार्याचा अमेरिकेतील हितचिंतक, देणगीदार, माजी विद्यार्थी आणि महाराष्ट्र मंडळांना व्यापक परिचय करून देण्याची संधी मिळाली. अधिवेशनापूर्वी शिकागो, वॉशिंग्टन डीसी, ह्युस्टन, अटलांटा आणि त्यानंतर सिएटल, सॅन फ्रान्सिस्को, सॅन होजे अशा विविध शहरांमध्ये भेटी, बैठका आणि संवाद झाले. या भेटींचा उद्देश केवळ समितीच्या कार्याची माहिती देणे हा नव्हता, तर विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील सहकार्याच्या आणि ‘कमवा व शिका’ अंतर्गत रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, हाही होता.



## डिजिटल माध्यमाच्या वापराची सूचना

रजनीताई जोगळेकर, रवी छत्रे आणि बाबासाहेब सोनावणे यांच्या पुढाकाराने वॉशिंग्टन डीसी येथे २ ऑगस्टला समितीच्या निवडक हितचिंतकांची बैठक झाली. समितीच्या गेल्या सात दशकांच्या प्रवासाची आणि सध्याच्या कार्याची माहिती देण्याची ही मोठी संधी ठरली. बैठकीला समितीचे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांचे अमेरिकास्थित नातेवाईक श्रीकांत साठे आवर्जून उपस्थित होते. समितीच्या कार्याची अधिक व्यापक ओळख निर्माण करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्याबाबत उपयुक्त सूचना यावेळी मिळाल्या. समितीच्या विविध प्रकल्पांवर आधारित चित्रफित तयार करून भारतातील तसेच अमेरिकेतील मराठी समाजापर्यंत समितीचे कार्य पोहोचवावे, ही कल्पना महत्त्वाची वाटली.

श्री. पुष्कराज परांजपे यांच्या आग्रहानुसार अटलांटा येथे झालेल्या भेटीत महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून समितीच्या विद्यार्थ्यांना ‘कमवा व शिका’ अंतर्गत कामाच्या संधी उपलब्ध करून देणे, वेबसाईट व डिजिटल कामे, स्मरणिका आदी उपक्रमांवर चर्चा झाली. श्री. जयंत उमराणी यांच्याबरोबरही Salesforce System Implementation, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि AI प्रशिक्षण यांसारख्या विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली.

## अधिवेशनात समितीचा सहभाग

सिएटल येथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनातील समितीच्या स्टॉलला चारही दिवस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हितचिंतक, देणगीदार, माजी विद्यार्थी, महाराष्ट्र मंडळांचे पदाधिकारी यांच्यासह अनेकांनी स्टॉलला भेट देऊन समितीचे कार्य जाणून घेतले. समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके, माजी विद्यार्थिनी योगिता येवले, व्हीएसएसएफच्या अध्यक्षा अंजलीताई अंतुरकर, नितीन अंतुरकर, मानसी व नितीन जोशी, योगेश्री फडके आणि इतर अनेक स्वयंसेवकांनी वेळ देऊन समितीच्या कार्याचा प्रसार केला. बीएमएमचे अध्यक्ष प्रसाद पानवलकर, अधिवेशन समन्वयक मोहित चिटणीस, बीएमएमचे नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल देशमुख, भारत प्रतिनिधी प्रसाद प्रधान, सर्व पदाधिकारी आणि स्वयंसेवक यांनी दिलेले सहकार्यही विशेष उल्लेखनीय आहे. अधिवेशन काळात समितीच्या स्टॉलला समितीचे देणगीदार विभा व गिरीश गायतोंडे, श्री. व सौ. शेंदुरे, साधना व सुनील शेणॉय, तसेच प्रसिद्ध क्रीडा समीक्षक सुनंदन

पान ३ वर ▶

# खडतर प्रवास समितीमुळे झाला सुकर!

## तयाचा वेलू...

डॉ शोभा सुनील गायके

शिक्षणासाठी मी खरीखुरी खडतर वाट चालले आहे. आमचे घर गावापासून लांब डोंगरावरच्या मळ्यात. दगडगोट्यांची वाट तुडवत शाळेत ये- जा करावी लागे. एकदा आमच्या वस्तीवर राहणाऱ्या मुलामुलींनी एकत्र येऊन, सुटीच्या दिवशी वाटेवरचे दगडगोटे, काटेकुटे साफ केले आणि शाळेत जाण्यासाठी पायवाट तयार केली. रस्त्यात असलेल्या अडचणी शक्य तितक्या कमी करून प्रवास सुरू ठेवायचा, हा धडा तेव्हाच मिळाला.

या प्रवासात आई ही माझी पहिली गुरू आहे. आई जेमतेम चौथीपर्यंत शिकलेली, पण लेकीच्या शिक्षणात कधीही कुठलीही आडकाठी तिने आणली नाही. मुलगी म्हणून कुठली बंधनं घातली नाहीत. तिने टाकलेल्या विश्वासामुळेच मला अधिक जबाबदारीने वागायचे भान आले. माझे गाव अहिल्यानगर जिल्ह्यातील वाडे गव्हाण (ता. पारनेर). माझी आत्या शिकलेली, शाळेत नोकरी करणारी, त्यामुळे घरात शिक्षणाचे वातावरण होते. माझे शालेय शिक्षण गावातील शाळेत झाले. दहावीनंतर शिक्षणासाठी पुण्यात काकांकडे आले. अकरावी- बारावी त्यांच्याकडे राहून केली. त्यानंतर काकांची बदली झाली. राहण्याचा प्रश्न निर्माण झाला. माझी मैत्रीण समितीमध्ये राहात होती. ती मला समितीमध्ये घेऊन आली. मी पंधरा दिवस समितीमध्ये चकरा मारत होते. रोज पटवर्धनसरांना भेटायचे. मला त्यांचा तेव्हाचा चेहरा अजून आठवतोय. ते हळूच वर पाहायचे आणि मला बघून हसायचे, आली परत ...अशा अर्थाचे! तुझी बाहेर सोय होऊ शकेल, असे त्यांचे म्हणणे. मेडिकल कॉलेजमध्ये जाणारा वेळ आणि पैशाची नड यामुळे मला ते शक्य नाही, हे मी त्यांना पटवून दिले आणि शेवटी माझी चिकाटी बघून आणि गरज ओळखून त्यांनी मला प्रवेश दिला.



समितीत वेगवेगळ्या उपक्रमांत भाग घेतल्यामुळे खूप शिकायला मिळाले. मी सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत पोलिस वसाहतीतील मुलांना दोन वर्षे शिकविले. लायब्ररी प्रमुख म्हणून काम केल्यामुळे मला वाचनाची गोडी लागली. सांस्कृतिक कार्यक्रमात मी आवडीने भाग घेत असे. या सगळ्यामुळे खूप मैत्रिणी मिळाल्या, ज्या अजूनही आहेत. संपर्क वाढला. वेगवेगळ्या लोकांशी कसे बोलायचे, कसे वागायचे, हे समजले, जे माझ्या वैद्यकीय व्यवसायात मला खूप उपयोगी पडते.

कमवा- शिका अंतर्गत मी एका लहान दिव्यांग मुलाला फिजिओथेरपी द्यायला जायचे. माझे समितीतील पालक डॉक्टर होते. त्यांना भेटायला गेल्यावर ते आवर्जून अभ्यासाची चौकशी करायचे. एखादा भाग समजला नसेल, तर शनिवार- रविवारी बोलावून समजावून सांगायचे. अशा लोकांशी समितीमुळे जोडून घेता आले. समितीत राहून कष्ट करण्याची सवय लागली. एकत्र कुटुंबात आनंदाने राहण्याचे कौशल्य समितीमुळेच शिकता आले. याचा उपयोग संसारात झाला. सासरी आमचे एकत्र कुटुंब. डॉक्टर झालेली मुलगी, तिला काय येत असणार, असे सासूबाई आणि घरातली इतर मंडळी गृहीत धरून चालली होती. पण मी पहिल्या दिवसापासून इतक्या सगळ्यांचा स्वयंपाक करू शकले आणि मग घरातल्या सगळ्यांची माझ्यावर इतकी मर्जी बसली, की काहीही अडले की माझ्याकडे उत्तर असेलच, ही सगळ्यांना खात्री वाटते.

वैद्यकीय शिक्षण पूर्ण होईपर्यंत, म्हणजे पाच वर्ष समितीमध्ये राहिले. ते माझ्या आयुष्यातील सगळ्यात चांगले दिवस होते. टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून डॉक्टर झाल्यानंतर गेली ३२ वर्षे मी पारनेर तालुक्यातील ढोकळी येथे वैद्यकीय व्यवसाय करीत आहे. सकाळी नऊपासून रात्री नऊपर्यंत... मधे केवळ एखाद्या तासाचा ब्रेक. समितीने कष्टाची लावलेली सवय अजूनही कामी येते. माझे पतीही डॉक्टर आहेत. मोठा मुलगा सिद्धांत कॉम्प्युटर इंजिनीअर आहे. धाकटा डॉ. संग्राम कराड येथे एम.एस.चे शिक्षण घेत आहे.

आयुष्यात एमबीबीएस करण्याची संधी थोडक्यात हुकल्याची खंत आहे. मात्र समितीमुळे आयुष्याला आकार मिळाल्याची, आयुष्य सुखात गेल्याची जाणीवही आहे. मला कविता करण्याचा छंद आहे. समितीतील मैत्रिणींना अजूनही त्यांच्या वाढदिवसाला मी काव्यमय शुभेच्छा पाठविते. मैत्रिणीसुद्धा त्या कवितांना दाद देतात. समितीवरही मी कविता केलेली आहे.

# बारामतीच्या अभ्यासदौऱ्यात कृषी तंत्रज्ञानाची माहिती

## पर्यवेक्षकांसह ४५ विद्यार्थ्यांचा सहभाग

कृषी तंत्रज्ञान आणि आधुनिक शेती पद्धतीची माहिती घेण्यासाठी ८ ऑगस्ट रोजी समितीतील विद्यार्थ्यांचा बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात अभ्यासदौरा आयोजित केला होता. या दौऱ्यात चार पर्यवेक्षकांसह ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आधुनिक शेतीमध्ये वापरले जाणारे सेन्सर, ड्रोन तंत्रज्ञान, हवामानाचा डेटा, माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, उसाच्या विविध जाती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान यांचा अभ्यास करणे, हा या अभ्यासदौऱ्याचा उद्देश होता.

या दौऱ्यात केव्हीकेचे श्री. करंजे, श्री. जगदाळे व श्री. आकाश यांनी मॉडेल डेव्हलपमेंट आणि त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना दिली. पिकांना पाणी देण्यासाठी सेन्सरची कशी मदत होते, हवामानाच्या डेटाच्या आधारे पावसाचा अंदाज कसा मिळतो, त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी देणे, खतांचा वापर करणे किंवा इतर शेतीची कामे यांचे नियोजन कसे करता येते, या माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. ड्रोन आणि कॅमेऱ्यांचा शेतीसाठी कसा वापर केला जातो, हे समजले. शेतीमध्ये आंतरपीक घेण्याचे महत्त्व लक्षात आले.

या दौऱ्यात राजेश्वर पोहरे पाटील, सचिन खांडेकर, शीतल शिंदे, हेमा बापट यांच्यासह २८ मुले आणि १७ मुली सहभागी झाल्या होत्या.





# समितीतील युवाशक्ती देईल देशाच्या प्रगतीमध्ये योगदान

## ब्रिगेडियर अभय भट यांचा विश्वास; स्वातंत्र्यदिन साजरा

युवा पिढी ही प्रचंड आत्मविश्वास, जिद्द असलेली आणि नवतंत्रज्ञानाशी सुसंगत अशी आहे. या पिढीला योग्य दिशा मिळाली, तर देशाचा सर्वांगीण विकास झपाट्याने होईल. विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये शिक्षण, संस्कार व मूल्यांची शिकवण दिली जात आहे. भारताच्या प्रगतीमध्ये भरीव योगदान देऊ शकणारी युवाशक्ती येथे घडत आहे. त्यामुळे देशाचे उज्ज्वल भविष्य सक्षम पिढीच्या हाती जाईल, असा विश्वास ब्रिगेडियर अभय भट (निवृत्त) यांनी व्यक्त केला.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय विद्यार्थी संकुलात भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनी ब्रिगेडियर भट यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.या प्रसंगी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, खजिनदार संजय अमृते, वसतिगृह उपसमितीचे अध्यक्ष दिनकर वैद्य यांच्यासह विश्वस्त, कार्यकर्ते, पर्यवेक्षक, आजी- माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ब्रिगेडियर अभय भट म्हणाले, "शिस्त, धैर्य, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण हे यशस्वी जीवनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःच्या करिअरचा विचार न करता समाज आणि देशासाठी आपण काय योगदान देऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे."

### ओंकार आणि तेजश्रीला पारितोषिक

**या कार्यक्रमात आदर्श विद्यार्थी म्हणून ओंकार जरे याला ॲड. शामसुंदर जावडेकर, इंदापूर पारितोषिक, तर आदर्श विद्यार्थिनी म्हणून तेजश्री इथापे हिला वासंतीबाई जावडेकर, इंदापूर पारितोषिक पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.**

दिनकर वैद्य यांनी प्रास्ताविकात समितीचे कार्य आणि उपक्रमांविषयी माहिती दिली. सानिका येलमाटे हिने पाहुण्याचा परिचय करून दिला. सानिका खामणकर हिने सूत्रसंचालन केले. रुद्र जगदाळे याने आभार मानले. समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात कार्यकर्ते हेमंत राजहंस, सुमित्रा सदन वसतिगृहात कार्यकर्त्या वासंती नाटेकर यांच्या हस्ते, लजपतराय भवन येथे कार्यकर्ते मधुसुदन बडवे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

# नेतृत्व विकास कार्यक्रमातून मिळाले सामाजिक भान

## समितीतील तीन विद्यार्थ्यांना मिळाली संधी

आनंदवन आणि हेमलकसा येथे झालेल्या दहा दिवसीय युवा नेतृत्व विकास कार्यक्रमात भाग घेण्याची संधी समितीतील तीन विद्यार्थ्यांना मिळाली. अमेरिकेतील इंडियन्स फॉर कलेक्टिव्ह ॲक्शन (आयसीए) फाऊंडेशनच्या १५ विद्यार्थिनींचा या कार्यक्रमात सहभाग होता.

या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी स्थानिक विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी संवादकौशल्य, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि करिअरच्या संधी याविषयी मार्गदर्शन सत्रे घेतली. तसेच सेंद्रिय शेती, प्राण्यांची देखभाल, रुग्णालयीन सेवा आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. रक्तगट तपासणी व इतर प्रयोगशाळेतील प्रक्रियांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करताना विद्यार्थ्यांना आरोग्यसेवेचा अनुभव मिळाला.

डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. विकास आमटे यांच्याशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. अमेरिकेतील विद्यार्थ्यांसोबत काम करताना संवाद, संघभावना, वेळेचे नियोजन, सहकार्य आणि विविधतेचा स्वीकार यांचा अनुभव मिळाला. नेतृत्व म्हणजे पद किंवा अधिकार नव्हे, तर संवेदनशीलतेने जबाबदारी स्वीकारून इतरांच्या उन्नतीसाठी कार्य करणे, हे या कार्यक्रमातून शिकायला मिळाले, असे सहभागी विद्यार्थी प्रेम पाटील, श्रीशकुमार शिंदे, सिद्धार्थ वाळुंज यांनी सांगितले.





# पराग परांजपे यांच्याकडून १५ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

पैशांअभावी तुमचे शिक्षण थांबू नये, यासाठी दिलेल्या या मदतीचा तुमच्या प्रगतीसाठी उपयोग करा, असा सल्ला पराग परांजपे यांनी समितीच्या विद्यार्थिनींना दिला. पत्नी प्राजक्ता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. परांजपे यांनी समितीच्या १२ विद्यार्थिनींना प्रत्येकी १५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली. यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त रत्नाकर मते, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, पर्यवेक्षिका सविता भुक्ते आदी उपस्थित होते. या विद्यार्थिनींनी आपण कोणत्या भागातून आलो, काय शिक्षण घेत आहोत, भविष्यात काय नियोजन आहे या अनुषंगाने ओळख करून दिली. प्रत्येक विद्यार्थिनीने इंग्रजीमध्ये आपली ओळख व्हिडिओ करून पाठवावा, असा सल्ला त्यांनी दिला.

# माजी विद्यार्थ्यांनी लुटला वर्षा सहलीचा आनंद

आकाशातून खाली उतरणारे ढगांचे पुंजके पावसाची रिमझिम, मधूनच येणारे उनाचे कवडसे आणि हिरवागार निसर्ग अशा वातावरणात समितीच्या माजी विद्यार्थ्यांनी मुळशीतील कोळवण येथे कुटुंब आणि मित्र परिवारासह सहलीचा आनंद लुटला. माजी विद्यार्थी मंडळातर्फे दरवर्षी वर्षा सहलीचे आयोजन केले जाते. यावर्षीची सहल २३ ऑगस्टला कोळवणजवळ तिकोना फार्म येथे गेली होती. सहलीत ५० हून अधिक माजी विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले होते. गप्पा, गाणी, विनोद, संगीत खुर्ची, गाण्यांवर रिल्स, मोबाईलमध्ये निसर्गाची विविध रूपे टिपत सर्वजण स्वतःला विसरून गेले. सहलीचे नियोजन मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, निसार चौगुले यांनी केले.



# माहेश्वरी, चैतन्य यांच्या नेतृत्व गुणाचे कौतुक



विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणाचे कौतुक करण्यासाठी व अन्य विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने ग्रंथालय उपसमितीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात चैतन्य गर्जे व माहेश्वरी गिरडे यांचा सत्कार करण्यात आला. लतिका गायतोंडे वसतिगृहात हा कार्यक्रम झाला.

माहेश्वरी गिरडे हिने युवा नेतृत्व, सामाजिक कार्य, वक्तृत्व, महिला सक्षमीकरण, शैक्षणिक प्रसार आणि विविध नेतृत्व उपक्रमांमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविला आहे. नॅशनल यूथ लीडरशिप ॲवॉर्डसह विविध पुरस्कार तिला मिळाले आहेत. चैतन्य गर्जे याने नवी दिल्लीत विकसित भारत युवा संसदेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. माहेश्वरीचा सत्कार वासंती नाटेकर आणि सुप्रिया केळवकर यांच्या हस्ते, तर चैतन्य गर्जे याचा सत्कार वासंती नाटेकर, वल्लभ कोल्हटकर आणि तुषार रंजनकर यांच्या हस्ते करण्यात आला. कौतुक सोहळ्यात संजीवनी वंजारी व सानिका खामणकर यांनी या दोघांची मुलाखत घेतली.

# अमेरिकेतील ऋणानुबंधातून कार्याला नवी दिशा

▶ पान १ वरून

लेले, अविनाश धर्माधिकारी, संजय उपाध्ये, नाटककार विजय केंकरे, अभिनेत्री सायली संजीव, महाराष्ट्र फाउंडेशनचे अध्यक्ष विवेक पाटणकर, 'स्नेहालय'चे डॉ. गिरीश कुलकर्णी, 'स्नेहवन'चे अशोक देशमाने, दीपस्तंभ फाउंडेशनचे यजुवेंद्र महाजन, अमेरिकेतील मराठी खासदार श्रीनिवास ठाणेदार अशा अनेक दिग्गजांनी भेट दिली.

## 'कमवा व शिका'ला नवी दिशा

या दौऱ्याचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे 'कमवा व शिका' उपक्रमासाठी निर्माण झालेल्या नव्या संधी. बीएमएम अधिवेशनाच्या तयारी दरम्यान समितीच्या विद्यार्थ्यांनी वेबसाईट, सोशल मीडिया, डिजिटल फ्लायर्स, रील्स, व्हिडिओ एडिटिंग आणि इतर डिजिटल कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कामाचे बीएमएम टीमने मनापासून कौतुक केले. अमेरिकेतील विविध महाराष्ट्र मंडळांनीही भविष्यात विद्यार्थ्यांना वेबसाईट व्यवस्थापन, डिजिटल डिझाईन, व्हिडिओ एडिटिंग, डिजिटल अहवाल आदी कामांच्या संधी देण्याची तयारी दर्शवली. यामुळे 'कमवा व शिका' ही केवळ आर्थिक मदतीची योजना न राहता विद्यार्थ्यांच्या कौशल्याला जागतिक बाजारपेठेशी जोडणारा आणि त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देणारा उपक्रम होण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे.

## समितीच्या गुढ्यांचे आकर्षण

या अधिवेशनातील विशेष आकर्षण ठरल्या त्या समितीच्या मुलींनी तयार केलेल्या गुढ्या. 'कमवा व शिका' अंतर्गत १५ मुलींच्या गटाने अवघ्या १० दिवसांत २२०० गुढ्या तयार केल्या.



बीएमएमचे अध्यक्ष प्रसाद पानवलकर आणि अधिवेशन समन्वयक मोहित चिटणीस यांच्या सहकार्याने या गुढ्या रजिस्ट्रेशन कीटमधून अधिवेशनातील उपस्थितांना भेट देण्यात आल्या. समितीच्या मुलींच्या कौशल्याचे आणि मेहनतीचे अमेरिकेतील हजारो मराठी बांधवांनी कौतुक केले. या गुढ्या म्हणजे त्यांचे कौशल्य, स्वावलंबन आणि आत्मविश्वासाचे प्रतीक ठरल्या.

## हितचिंतकांचे ऋणानुबंध

शिकागो येथे समितीच्या माजी विद्यार्थिनी योगिता येवले यांच्या घरी झालेल्या बैठकीपासून या प्रवासाला सुरुवात झाली. योगिता यांनी नंतर सिएटल अधिवेशनात सलग चार दिवस स्टॉलवर काम केले. सिएटलमध्ये अनिकेत आणि निकिता यांच्या घरी राहण्याचा अनुभवही तितकाच आपुलकीचा होता. अनिकेत हे समितीचे माजी विद्यार्थी व कार्यकर्ते ज्ञानेश्वर खैरे यांचे पुत्र. समितीशी असलेला ऋणानुबंध पुढची पिढीही जपत असल्याचा आनंद झाला. सॅन फ्रान्सिस्को येथे माझ्या समितीचा विद्यार्थी असतानाच्या पालक रत्नाताई दाढे यांची त्यांच्या कन्या अमृता यांच्या घरी झालेली भेटही अत्यंत भावनिक आणि आनंददायी ठरली. समितीच्या कार्यकाळात निर्माण झालेली नाती, आजही प्रेम विश्वास आणि सहकार्याने टिकून आहेत. अमृता समितीच्या नियमित देणगीदार आहे, ही विशेष आनंदाची बाब आहे.

## पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा

अमेरिका दौऱ्यातील या सर्व भेटींचा अनुभव अत्यंत समाधानकारक आहे. समितीचे कार्य केवळ पुण्यापुरते मर्यादित नसून जगभरातील मराठी समाजाशी जोडले गेले आहे, याची पुन्हा एकदा प्रचिती आली. या दौऱ्यातून आर्थिक सहकार्याबरोबरच विद्यार्थ्यांना कामाच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, डिजिटल आणि एआय क्षेत्रातील प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा अनुभव आणि जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. समितीच्या कार्याचा डिजिटल माध्यमातून अधिक व्यापक प्रसार करण्यासाठी प्रकल्पनिहाय छोट्या चित्रफिती तयार करण्याची कल्पना पुढे आली आहे. त्या माध्यमातून समितीचा वर्तमान आणि डॉ अच्युतराव आपटे यांनी रुजवलेली मूल्ये व दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवता येईल. या दौऱ्यात वेळ देणाऱ्या, बैठका आयोजित करणाऱ्या, प्रेमळ आदरातिथ्य करणाऱ्या, स्टॉलवर काम करणाऱ्या, आर्थिक व व्यावसायिक सहकार्याची तयारी दर्शवणाऱ्या सर्व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार. या प्रवासात मिळालेली साथ, विश्वास आणि सहकार्य हीच समितीच्या पुढील वाटचालीची खरी ताकद आहे.

# समितीत आजी-माजी विद्यार्थ्यांचा रक्षाबंधन स्नेहसोहळा

**पुणे :** विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने आजी विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रम २८ ऑगस्टला झाला. माजी विद्यार्थी आणि आजी विद्यार्थी यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ व्हावेत, तसेच समितीच्या कुटुंबातील आपुलकीचे नाते जपले जावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात माजी विद्यार्थिनींनी आजी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना राखी बांधली. 'धागा प्रेमाचा, अतूट नात्याचा' या भावनेतून साजऱ्या झालेल्या या उपक्रमाला भावनिक आणि आनंददायी वातावरण लाभले.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी समितीतील आठवणींना उजाळा देत आजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, सचिव मनीषा गोसावी, प्रभाकर पाटील, अनिता देशपांडे, सुनीता पाटील, अलकनंदा पाटील, स्नेहा फडके, गणेश ननवरे व पर्यवेक्षक कुंदन पठारे उपस्थित होते.



# शाडू मातीतून साकारले बाप्पा



▶ पान १ वरून

कार्यशाळेचा प्रारंभ कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर यांच्या हस्ते, तसेच चंद्रकांत कुलकर्णी, प्रभाकर पाटील, अरुणा अत्रे, कविता हेबाळकर यांच्या उपस्थितीत झाले. चंद्रकांत कुलकर्णी यांची कन्या स्मृती हिच्या गणेशस्तवनाने कार्यशाळेची सुरुवात झाली. समितीच्या विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे, कलाकार व माजी विद्यार्थी जगनगडा, तसेच श्री. व सौ. पद्दे उपस्थित होते. वसतिगृह प्रमुख मोनाली, कुंदन पठारे आणि कला विभाग (दृश्य कला) विद्यार्थी प्रमुख साक्षी, श्रुती, आँचल, सिद्धी, पियुषकुमार यांनी नियोजन केले. धूप- दीप, फुलांचा सुगंध आणि भक्तिमय प्रसन्न वातावरणात सुरू झालेल्या या कार्यशाळेची सांगता 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात झाली.